पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन
कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/
वायरमन, 12 वी पास फ्रेश/
अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टिफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, नापासेस व प्लंबरसाठी सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५१ वा | बुधवार, दि. ०९ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

मराठा आरक्षणाचा एल्गार; सोलापूर-पुणे महामार्गावर रस्ता रोको!

सरकारने तातडीने तोडगा न काढल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा आंदोलकांचा इशारा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाचे पडसाद सोलापुरातही उमटले. आरक्षणाचा प्रश्न आणखी लांबवू नये, सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावा आणि जरांगे पाटील यांच्या उपोषणावर तोडगा काढावा, या मागणीसाठी मराठा समाजातील आंदोलकांनी सोलापूर-पुणे महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. आंदोलकांनी रस्त्यावरच ठाण मांडून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केल्याने महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभरातून आंदोलनाचा आवाज पुन्हा बुलंद होत असताना सोलापुरातही आंदोलक आक्रमक झाले. महामार्गावर ठिय्या देत आंदोलकांनी सरकारने आता केवळ आश्वासने न देता मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर निर्णायक भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. आरक्षणाचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवून समाजाच्या भावनांशी खेळ केला जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी

सोलापूर-पुणे महामार्गावर आंदोलक मोठ्या संख्येने एकत्र आले. रस्त्यावर ठिय्या देत त्यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली. सरकारने अंतरवली सराटीतील आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी, मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

'आरक्षणाचा प्रश्न आता निकाली काढा', अशी भूमिका घेत आंदोलकांनी सरकारच्या दिरंगाईविरोधात संताप व्यक्त केला. आरक्षणाबाबत ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत आंदोलनाची धग कायम राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

आंदोलकांनी महामार्गावरच ठिय्या दिल्याने सोलापूर-पुणे मार्गावरील वाहतुकीवर त्याचा थेट परिणाम झाला. काही काळ दोन्ही बाजूंनी वाहतूक खोळंबली आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. प्रवासी, वाहनचालक आणि नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला.

महत्त्वाच्या महामार्गावर आंदोलन झाल्याने वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण झाला. आंदोलनामुळे काही काळ निर्माण झालेली कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आंदोलकांशी चर्चा करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले.

'आश्वासन नको, आता निर्णय हवा'

मराठा आरक्षणाचा प्रश्न केवळ आश्वासनांपुरता मर्यादित न ठेवता सरकारने प्रत्यक्ष निर्णय घेण्याची गरज असल्याचे आंदोलकांनी स्पष्ट केले. अंतरवली सराटी येथे सुरू असलेल्या उपोषणाची सरकारने गांभीर्याने दखल घ्यावी. उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर तातडीने चर्चा करावी आणि आरक्षणाच्या प्रश्नावर ठोस मार्ग काढावा, अशी मागणी करण्यात आली.

सरकारने वेळकाढूपणा केल्यास आंदोलन आणखी तीव्र होईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आगामी काळात आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर वाहतूक पूर्ववत

महामार्गावर आंदोलन सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. आंदोलकांशी चर्चा करून महामार्ग मोकळा करण्याचे आवाहन करण्यात आले. काही काळानंतर आंदोलकांनी ठिय्या आंदोलन मागे घेतल्याने महामार्गावरील वाहतूक पूर्ववत झाली.

मात्र, या आंदोलनातून मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर समाजातील अस्वस्थता पुन्हा एकदा प्रकर्षाने समोर आली आहे. अंतरवली सराटीतील आंदोलनाचा सरकारने तातडीने विचार करून तोडगा काढला नाही, तर आंदोलनाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे. सोलापुरातील महामार्गावरील ठिय्या हा त्याच वाढत्या असंतोषाचा इशारा मानला जात आहे.

'मराठा आरक्षणाचा प्रश्न आणखी लांबवू नका!'

अंतरवली सराटीतील मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची तातडीने दखल घेऊन सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, या मागणीसाठी सोलापुरात आंदोलक रस्त्यावर उतरले. सोलापूर-पुणे महामार्गावर ठिय्या देत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने वाहनांच्या रांगा लागल्या. 'निर्णय घ्या; अन्यथा आंदोलनाची धग आणखी वाढेल,' असा स्पष्ट इशारा आंदोलकांनी दिला.

माढा-पंढरपूरमध्ये लोडशेडिंगचा फटका;

दुष्काळी उपाययोजनांसाठी प्रशासनाला साकडे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- माढा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न आणि सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर माढ्याचे आमदार अभिजित पाटील यांनी पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले आणि सोलापूर जिल्हाधिकारी एस. कातीर्केयन यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी मतदारसंघातील शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

माढा व पंढरपूर तालुक्यांत सध्या सुरू असलेल्या सिंगल फेज लोडशेडिंगमुळे शेतकरी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा

सामना करावा लागत आहे. त्यामुळे लोडशेडिंगचे प्रमाण कमी करून किमान आठ तास वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.

जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत कमी झालेल्या पावसामुळे माढा, माळशिरस, पंढरपूरसह सोलापूर जिल्ह्यातील अनेक भागांत दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी व पशुपालकांसमोर गंभीर अडचणी निर्माण झाल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, तसेच जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी गरजू गावांमध्ये तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. त्याचबरोबर पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली.

आर्थिक अडचणीत असलेल्या पालकांना दिलासा देण्यासाठी शाळांमधील विद्यार्थ्यांची फी कमी करण्याबाबतही प्रशासनाने आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन अस्तित्वात असतानाही त्यांच्या गरजेनुसार सौरऊर्जा कनेक्शनची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू करावीत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन संबंधित मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आमदार अभिजित पाटील यांनी व्यक्त केली.

अक्कलकोटमध्ये जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ रास्ता रोको

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ रविवारी अक्कलकोट-सोलापूर राज्यमार्गावर सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सकल मराठा समाजाचे संयोजक तथा श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्याध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनामुळे वाहतूक मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली.

रास्ता रोकोमुळे सोलापूर, कर्नाटक आणि मराठवाड्याकडे जाणाऱ्या वाहनांच्या तब्बल तीन किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या. यावेळी आंदोलकांनी ह्यएक मराठा, लाख मराठाह्णच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे, या मागणीसाठी उड्डाणपुलासह पाच प्रमुख मार्ग एकाच वेळी रोखण्यात आले. आंदोलनात युवकांची मोठी उपस्थिती होती, तर महिलांनीही लक्षणीय सहभाग नोंदविला.

यावेळी नगरसेवक संजय मोरे (मैंदर्गी), शहर शिवसेनाप्रमुख योगेश पवार, शिवप्रतिष्ठानचे वरुण शेळके, गोपीचंद लोंढे आणि वंदना टोणपे यांनी मनोगत व्यक्त केले.

आंदोलनानंतर सकल मराठा समाजाच्या वतीने नायब तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक अविनाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

आंदोलनास सुरेश सूर्यवंशी, बाबासाहेब निंबाळकर, प्रवीण घाटगे, तम्मा शेळके, मनोज निकम, अण्णासाहेब सुरवसे, सुधाकर गोंडाळ, प्रथमेश पवार, बालाजी पाटील, आतिष पवार, महेश दणके, वैभव मोरे, शितल फुटाणे, दयानंद काजळे, गोविंद शिंदे, राजाभाऊ शिंदे, भरत राजेगावकर, अक्षय मोरे, आकाश शिंदे, सरपंच नितीन मोरे, सरपंच दिलीप कदम, सरपंच राम मातोळे, दिलीप काजळे, दशरथ गायकवाड, मनोज इंगवले, समाधान मोरे, निशांत कवडे, प्रसाद मोरे, संतोष पाटील, ज्ञानेश्वर भोसले, प्रदीप सुरवसे, उमेश साळुंखे, रोहन जगताप, अंकुश मोरे, नाना काजळे, प्रविण देशमुख, सिद्धेश्वर मोरे यांच्यासह शहर व ग्रामीण भागातील मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'एकही मागणी मान्य नाही';

जरांगे पाटलांचा सरकारवर घणाघात

आंतरवलीसराटी (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज 11 वा दिवस आहे. सरकारसोबत मागण्यांवर चर्चा सुरू असली तरी अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याने जरांगे पाटील आंदोलनावर ठाम आहेत. एकीकडे सरकारकडून बैठका घेऊन मागण्या मान्य केल्याचं सांगितलं जात आहे, तर दुसरीकडे सरकारने काहीही मान्य केलं नसल्याचं जरांगे पाटील स्पष्टपणे सांगत आहेत.

मंत्री उदय सामंत यांनी सरकारने जरांगे यांच्या 15 पैकी 12 मागण्या मान्य केल्याचं म्हटलं. मात्र हा दावा जरांगे पाटलांनी फेटाळून लावला आहे. '15 पैकी एकही मागणी मान्य झालेली नाही,' असं म्हणत त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली.

उदय सामंतांच्या वक्तव्यावर जरांगेंचा पलटवार

मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल एकेरी भाषेत बोलू नये, असं उदय सामंत यांनी म्हटलं होतं. यावर जरांगे पाटील यांनी थेट उत्तर दिलं. "चुकीच्याला चुकीचं म्हणू नको काय? तुम्ही आम्हाला दलाल म्हणून बोलायला ठेवलं आहे का? तुमच्या मनगटात फक्त पैशाची ताकद आहे. शिंदेंनी चूक केली ती कबूल करा."

एकनाथ शिंदे यांच्याबद्दल बोलल्याचं वाईट वाटलं, मात्र शिरसाटांचं ऐकून मराठा समाजाची प्रमाणपत्रं रद्द का केली, असा सवालही त्यांनी उदय सामंत यांना केला.

राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही जरांगे यांनी निशाणा साधला. "राधाकृष्ण विखेंचं सोडून

काहीही विचारा. मराठ्यांना याने अर्धवट फासावर सोडून दिलं. हा फक्त आंदोलन कसं मोडलं पाहिजे यांचं बघतो." फडणवीस आणि शिंदे यांच्या सांगण्यावरून सरकारमधील मंत्री आपल्यावर हल्लाबोल करत आहेत का, असा सवालही त्यांनी केला.

'एकही मागणी मान्य नाही'

सरकारने 15 पैकी 12 मागण्या मान्य केल्याच्या दाव्यावर जरांगे पाटील चांगलेच संतापले. "15 पैकी 12 मागण्या मान्य, याला न्याय देणं म्हणत नाहीत. खाली ते मान्य केलं जातं नाही, तुम्ही गरीबांचं वाटोळं केलं. तुम्ही मराठा समाजाला पश्चाताप करण्याच्या उंबरठ्यावर आणलं."

सरकार शिष्टमंडळासमोर एक आणि नंतर वेगळी भूमिका घेत असल्याचा आरोपही त्यांनी केला. "तुम्ही काहीही मान्य केलं नाही, 15 पैकी एकही मागणी मान्य झालेली नाही."

भरत गोगावलेंना जरांगेंचा इशारा

एकेरी भाषेत बोलल्यास जशास तसं उत्तर देऊ, असं मंत्री भरत गोगावले यांनी म्हटलं होतं. त्यावर जरांगे पाटील यांनीही आक्रमक भूमिका घेतली. "मी तयार आहे, कधीही सज्ज आहे, माझ्या नादेला लागायचं नाही. माझ्याकडे पुरावा आहेत. मीडियात पुरावा देईन, मी शिंदेंवर बोलणार आहे."

83 तालुक्यात पावसाचा मोठा खंड

खरीप हंगाम वाया जाण्याची भीती, शेतकरी चिंताक्रांत

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जुलै महिन्यात सर्वदूर हजेरी लावणाऱ्या पावसाने ऑगस्टपासून राज्याच्या बहुतांश भागाकडे पाठ फिरवली आहे. 1 ऑगस्ट ते 7 सप्टेंबर 2026 या दरम्यान राज्यातील 11 जिल्ह्यांत तब्बल 30 दिवसांहून अधिक दिवस पावसाचा खंड पडला आहे.

तर चार महसुली विभागांमधील 83 तालुक्यांमध्ये 20 दिवसांपेक्षा जास्त कालावधीचा दीर्घकालीन पर्जन्यखंड नोंदवला गेला आहे. त्यामुळे या भागात विशेषतः मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट असून पावसाची ओढ कायम राहिल्यास खरीप हंगाम वाया जाण्याच्या भीतीने शेतकरी वर्ग चिंतेत आहे.

कृषी खात्याच्या जिल्हानिहाय आकडेवारीनुसार, अडीच मिलिमीटरपेक्षा कमी पाऊस झालेला कालावधी हा पावसाचा खंड म्हणून ग्राह्य धरला आहे. त्यानुसार अहिल्यानगर आणि पुणे या दोन जिल्ह्यांत सर्वाधिक 38 दिवस पावसाचा खंड नोंदला आहे. त्याखालोखाल बुलढाणा, नाशिक, सांगली आणि सातारा या चार जिल्ह्यांत 37 दिवसांचा खंड आहे.

बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव आणि सोलापूर या जिल्ह्यांत प्रत्येकी 34 दिवसांचा, तर परभणी जिल्ह्यात 30 दिवसांचा पावसाचा खंड पडला आहे.

तालुकानिहाय पावसाचा खंड

- 38 दिवसांचा खंड : कर्जत (जि. अहिल्यानगर), शिरूर (जि. पुणे)
- 37 दिवस : खामगाव (जि, बुलढाणा), नांदगाव, येवला (जि. नाशिक), बारामती, दौंड, पुरंदर (जि. पुणे), आटपाडी (जि. सांगली), फलटण, माण (जि. सातारा)
- 35 दिवस : संगमनेर (जि. अहिल्यानगर), कळवण, देवळाली (जि.नाशिक)
- 34 दिवस : शेवगाव (जि. अहिल्यानगर), गेवराई (जि.बीड), पैठण (जि. छत्रपती संभाजीनगर), परांडा (जि. धाराशिव), इंदापूर (जि. पुणे), माळशिरस (जि. पुणे)
- 33 दिवस : सांगोला(जि. सोलापूर)
- 31 दिवस : बार्शी, मोहोळ (जि. सोलापूर)

याशिवाय धुळे, जळगाव आणि जालना या जिल्ह्यांत 26 दिवसांचा, अकोला आणि वाशिममध्ये 23 दिवसांचा, अमरावतीत 22 दिवसांचा, वर्ध्यात 21 तर नागपूरमध्ये 20 दिवसांचा खंड नोंदविण्यात आला आहे.

पिकांवर परिणाम होण्याची शक्यता

खरीप पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात पावसाने ओढ दिल्याने त्याचा परिणाम पिकांवर होण्याची शक्यता आहे. विशेषतः हलक्या जमिनीतील पिकांवर त्याचा परिणाम अधिक जाणवू शकतो. त्यामुळे पुढील काही दिवसांत पाऊस होतो किंवा कसे, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

प्रत्येक पात्र मतदाराचे नाव अंतिम यादीत आलेच पाहिजे : शीतल तेली-उगले

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (रक्फ) अंतर्गत मतदार यादीचे काम करताना सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परस्परांमध्ये समन्वय ठेवून एक टीम म्हणून काम करावे. मतदार हाच केंद्रबिंदू असून प्रत्येक पात्र मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट होईल, याची दक्षता घ्यावी. आगामी ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याने प्रत्येक टप्प्याचे काटेकोर नियोजन करून विहित मुदतीत काम पूर्ण करावे, अशा सूचना मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात एसआयआर अंतर्गत सर्व मतदान नोंदणी अधिकारी यांची आढावा बैठक घेण्यात आली, त्याप्रसंगी श्रीमती तेली उगले मार्गदर्शन करत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, सोलापूर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, मतदार नोंदणी अधिकारी सुमित शिंदे, अमित माळी, सीमा होळकर, अंजली मरोड, जयश्री आव्हाड, सदाशिव पडदुने, सचिन इथापे, सुशांत बनसोडे, अमोल सिंह भोसले, उपस्थित होते.

मतदार यादी निरीक्षक

श्रीमती तेली पुढे म्हणाल्या की, एसआयआरच्या प्रत्येक टप्प्याबाबत अधिकाऱ्यांनी सखोल अभ्यास करून काम करण्याची आवश्यकता आहे. अधिकाऱ्यांनी परस्परांमध्ये नियमित संवाद ठेवावा. एसआयआर अंतर्गत एखाद्या विषयाची माहिती नसेल तर त्याबाबत योग्य माहिती घेऊनच पुढील कार्यवाही करावी. अपुरी अथवा चुकीची माहिती देणे टाळावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

दावे-हरकतींच्या सुनावणीचे योग्य नियोजन करा

प्रारूप मतदार यादीवर प्राप्त होणाऱ्या दावे व हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी स्वतंत्र आणि नियोजनबद्ध वेळापत्रक तयार करावे. संबंधितांना सुनावणीच्या नोटिसा बजावताना उपलब्ध असलेल्या विविध माध्यमांचा प्रभावी वापर करावा. आवश्यकतेनुसार व्हॉट्सॲप संदेशाचाही वापर करून संबंधितांपर्यंत सूचना पोहोचवाव्यात, असे त्यांनी सांगितले.

सुनावणीच्या वेळी एखाद्या मतदाराच्या नागरिकत्वाबाबत शंका निर्माण झाल्यास संबंधित कागदपत्रांची योग्य प्रकारे तपासणी करावी. मतदार यादीतील माहितीच्या अचूकतेबरोबरच प्रक्रियेची पारदर्शकता कायम ठेवावी. ईआरओ डॅशबोर्डवरील माहिती सुरक्षित ठेवण्याची विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

फॉर्म ७ व ८ च्या गैरवापरास प्रतिबंध करा

मतदार यादीत बदल अथवा नाव वगळण्याच्या प्रक्रियेत नियमांचे काटेकोर पालन करावे. बल्कमध्ये अर्ज स्वीकारू नयेत. फॉर्म क्रमांक ७ व ८ चा गैरवापर होणार नाही, यासाठी विशेष दक्षता घ्यावी. मृत व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळताना संबंधित मृत्यू प्रमाणपत्राची तपासणी करूनच आवश्यक ती कार्यवाही करावी, असे तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

तसेच, प्रत्येक मतदार नोंदणी अधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रातील व्हीआयपी मतदारांची यादी स्वतः तपासावी, अशी सूचनाही त्यांनी केली. एसआयआर अंतर्गत कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची तातडीने स्थापना करावी, असे निर्देशही मतदार यादी निरीक्षक शीतल तेली-उगले यांनी दिले.

अंतिम मतदार यादी अचूक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सर्व (पान 2 वर..)

संपादकीय

सिस्टीमवर किती विश्वास ठेवायचा?

सैन्याच्या गोदामातील शस्त्रचोरीपासून बँकेच्या तिजोरीतील नोटांच्या अदलाबदलीपर्यंत; सरकारी पैशांच्या गैरव्यवहाराने आणि राजकीय देणग्यांच्या आकड्यांनी व्यवस्थेवर गंभीर प्रश्न

नवी दिल्ली : देशातील सुरक्षा, बँकिंग आणि सरकारी आर्थिक यंत्रणेवर नागरिकांनी किती विश्वास ठेवायचा, असा सवाल उपस्थित करणाऱ्या घटना एकापाठोपाठ समोर येत आहेत. सिकंदराबादच्या अत्यंत सुरक्षित लष्करी परिसरातून शस्त्रांची चोरी, पंजाब नॅशनल बँकेच्या चलन तिजोरीत कोट्यवधींच्या खऱ्या नोटांच्या जागी बनावट नोटा आढळणे आणि हरियाणा सरकारच्या निधीच्या कथित गैरव्यवहारापाठोपाठ गुजरातमधील एका नोंदणीकृत मात्र मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षाच्या कोट्यवधींच्या देणग्यांचा प्रकार चर्चेत आला आहे.

सिकंदराबादमधील मद्रास रेजिमेंटच्या सुरक्षित शस्त्रसाठ्यातून चार अङ-203 रायफल्स, एक क्टरअर रायफल, सात पिस्तुले, मॅगझिन आणि मोठ्या प्रमाणात दारुगोळा चोरीला गेल्याचे समोर आले आहे. शस्त्रसाठ्याचे कुलूप तुटलेले आढळल्यानंतर पोलिस आणि लष्कराने तपास सुरू केला असून, या प्रकरणात 'आतील व्यक्ती'च्या सहभागाची शक्यताही तपासली जात आहे.

दुसरीकडे, उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे पंजाब नॅशनल बँकेच्या चलन तिजोरीत सुमारे ७.४ कोटी रुपयांच्या अस्सल नोटांच्या जागी बनावट नोटा ठेवण्यात आल्याचा आरोप समोर आला आहे. या प्रकरणात बँक अधिकाऱ्यांसह काही व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून विशेष तपास पथकाची चौकशी सुरू आहे.

हरियाणा सरकारच्या निधीशी संबंधित प्रकरणात तर सरकारी पैशांच्या सुरक्षेवरच गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. अंमलबजावणी संचालनालयाच्या म्हणण्यानुसार, सरकारी खात्यांतून वळवलेल्या निधीपैकी सुमारे २०३ कोटी रुपये एका शेल कंपनीमार्फत ज्वेलर्सकडे वळवून त्याबदल्यात रोख रक्कम घेण्यात आली, असा आरोप आहे. या प्रकरणात बनावट कागदपत्रे आणि शेल कंपन्यांच्या माध्यमातून निधी फिरवल्याचा तपास सुरू आहे.

आता गुजरातमधील राजकीय देणग्यांचा आकडा आणखी वेगळा प्रश्न उभा करतो. इइउ हिंदीच्या वृत्तावर आधारित माहितीनुसार, गुजरातमधील सहा Registered Unrecognised Political Partiesना २०२३-२४ मध्ये मिळून सुमारे १,७०० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या. यातील काही पक्षांना मिळालेल्या देणग्यांचे प्रमाण त्यांच्या प्रत्यक्ष राजकीय अस्तित्वाच्या तुलनेत अत्यंत मोठे असल्याने पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

याच मालिकेत New India United Partyचे उदाहरण चर्चेत आले आहे. पक्षाने २०२४च्या लोकसभा निवडणुकीत गुजरातमध्ये तीन जागांवर उमेदवार उभे केले आणि तिन्ही उमेदवारांना मिळून ८,५४२ मते मिळाली. मात्र पक्षाच्या लेखापरीक्षित अहवालानुसार सुमारे २९० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्याचे समोर आले आहे. पक्षाने लाऊडस्पीकर व मायक्रोफोनसाठी २०.७० कोटी, झेंडे-दुपट्ट्यांसाठी २०.९९ कोटी, प्रचारासाठी ९२.७७ कोटी, रॅली-मोर्चे व भोजनासाठी ७५.९० कोटी आणि होर्डिंग-बॅनरसाठी २६.३३ कोटी रुपये खर्च दाखवले आहेत.

या आकडेवारीवरून गैरव्यवहार झाला, असा निष्कर्ष काढता येत नाही; मात्र इतक्या मोठ्या आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता, पैशांचा स्रोत आणि त्यावर झालेली देखरेख याबाबत प्रश्न विचारले जाणे स्वाभाविक आहे.

एकीकडे सामान्य नागरिकाच्या प्रत्येक व्यवहारावर नजर ठेवणारी यंत्रणा, दुसरीकडे सुरक्षित लष्करी गोदामातून शस्त्रे गायब होणे, बँकेच्या तिजोरीत बनावट नोटा पोहोचणे, सरकारी निधी शेल कंपन्यांमार्फत फिरवल्याचे आरोप आणि कोट्यवधींच्या राजकीय देणग्यांचे रहस्य...

मग प्रश्न एवढाच—सिस्टीमवर विश्वास ठेवायचा तरी किती?

नोटबंदीच्या काळात काळ्या पैशावर आणि बनावट नोटांवर कठोर प्रहार करण्याचे दावे करण्यात आले होते. आज मात्र सुरक्षित यंत्रणांच्या आतच अशा प्रकारच्या घटना समोर येत असतील, तर नियम सामान्य नागरिकांसाठी आहेत की व्यवस्था सांभाळणाऱ्यांसाठीही?

या सर्व प्रकरणांची निष्पक्ष, पारदर्शक आणि वेळेत चौकशी होणे हीच आता जनतेची अपेक्षा आहे.

मोठा आवाज म्हणजे मोठा उत्सव नव्हे

सदानंद बापट नावाचा एक बुद्धिमान, विवेकी आणि विज्ञानवादी व्यक्ती सामान्यांच्या आरोग्याचा, सार्वजनिक शांततेचा आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न हातात घेऊन आवाज उठवत आहे. मात्र, त्यांची टिंगल केली जात आहे, त्यांच्यावर संशय व्यक्त केला जात आहे. डीजेच्या विरोधात पुण्यात बापट अत्यंत समर्पक भूमिका मांडत आहे. त्यांच्या बोलण्याची पद्धत, हातवारे करण्याची शैली आणि मराठी भाषेचा वापर यावरच अधिक चर्चा होत असल्याचे एकूणच विविध माध्यमांतून पाहायला मिळत आहे.

बापट स्वतः सांगत आहेत की, त्यांच्या मराठी भाषेच्या बोलण्यावर, त्यांच्या विचारधारेवर अथवा त्यांच्या दिसण्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर सर्वांनी चर्चा केली पाहिजे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर चर्चा करण्यापेक्षा त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे गांभीर्य समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे.

बुद्धिप्रामाण्यवादाचा आपल्याला गेल्या काही वर्षात विसर पडत चालला आहे. त्याची आठवण करून देण्याचे काम बापट यांच्यासारखे लोक करत आहेत. गणेशोत्सवातील डीजेच्या मुद्द्यावरून गेल्या आठवड्यापासून महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली आहे. डीजेच्या अतितीव्र आवाजाचे दुष्परिणाम नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. व्यक्तीच्या हात, पाय, डोळे, कान आणि मेंदू या सर्व अवयवांची काही ना काही क्षमता आणि मर्यादा असते. उदाहरणार्थ, डोळे एका मर्यादेपर्यंतच प्रखर प्रकाश सहन करू शकतात. त्यापेक्षा अधिक तीव्र प्रकाश डोळ्यांसाठी हानिकारक ठरू शकतो. त्याचप्रमाणे आपण हाताने एका मर्यादेपर्यंतचेच वजन उचलू शकतो. त्यापेक्षा अधिक वजन उचलल्यास दुखापत होण्याचा धोका असतो.

कानांचीही एक विशिष्ट मर्यादा असते. त्यापेक्षा अधिक तीव्र आणि कर्कश आवाजामुळे श्रवणशक्तीवर विपरीत परिणाम होऊ शकतो. अतितीव्र आवाजाचा परिणाम तणाव, झोप आणि एकूणच मानसिक व शारीरिक आरोग्यावर होऊ शकतो.

सार्वजनिक उत्सव कोणत्याही जाती-धर्माचा असो, त्यामध्ये सार्वजनिक शांततेचा मोठ्या प्रमाणावर भंग होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. नागरी वस्त्यांमधून डीजेच्या प्रचंड

आवाजात मिरवणुका जात असताना तेथील नागरिकांना कानात कापसाचे बोळे घालून बसावे लागते. काही नागरिकांना तर काही काळासाठी घराबाहेर जावे लागते. उत्सव साजरा करताना त्याचा इतरांना त्रास होत आहे, हे माहीत असूनही त्या त्रासाचे समर्थन करणे कितपत योग्य आहे, याचा विचार करण्याची गरज आहे.

उत्सव हे केवळ मोठ्या आवाजाचे प्रदर्शन करण्यासाठी नसतात. त्यातून सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक प्रबोधनाची प्रक्रिया घडली पाहिजे. समाजाला काही सकारात्मक देणारे उपक्रम उत्सवांचा भाग झाले पाहिजेत. परंपरेचे जतन करणे महत्त्वाचे असले, तरी प्रत्येक परंपरा केवळ जुनी आहे म्हणून ती योग्यच असेल, असे मानता येणार नाही. बापट देखील या संदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतात. परंपरा जपण्याच्या नावाखाली आपण सतीप्रथा, बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, केशवपन यांसारख्या अमानवी प्रथांचेही पुनरुज्जीवन करणार आहोत का? असे ते म्हणतात. अर्थातच नाही. कारण काळानुसार समाजातील रूढी-परंपरांचे परीक्षण करणे आवश्यक असते. त्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला, न्यायाला आणि मानवी मूल्यांना कितपत धरून आहेत, हे तपासणे हीच विवेकवादी समाजाची ओळख आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोन जपणे आणि तो वाढवणे यातूनच देशाचा विकास होणार आहे. जुन्या प्रथा कोणत्याही धर्माच्या असोत, त्या वैज्ञानिकता, न्याय आणि मानवी मूल्यांच्या कसोटीवर कितपत योग्य आहेत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

भारतात ध्वनी हा केवळ त्रासदायक घटक नसून सार्वजनिक आरोग्यावर परिणाम करणारे प्रदूषण आहे, ही भूमिका वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे न्यायव्यवस्थेनेही मान्य केली आहे. १९८०च्या दशकात डॉ. यशवंत ओक यांनी ध्वनी प्रदूषणाविरोधात लढा देत न्यायालयीन पातळीवर ध्वनिक्षेपकांच्या वापरासाठी वेळ आणि जागेच्या मर्यादा निश्चित करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. ध्वनी प्रदूषणाबाबत डॉ. ओक यांनी मांडलेली एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'जुलमाचे श्रोते'. एखाद्या व्यक्तीला नको असतानाही तिला मोठा आवाज ऐकण्यास भाग पाडले जाते, तेव्हा तिच्यावर तो आवाज लादला जातो. सततच्या आणि अतितीव्र आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होऊ शकतो, चिडचिड आणि मानसिक तणाव वाढू शकतो, झोपेवर परिणाम होऊ शकतो आणि कालांतराने आरोग्याच्या विविध समस्या निर्माण होऊ शकतात.

शांतता हा काही निवडक लोकांचा विशेषाधिकार नाही, हे समाजाच्या आणि न्यायव्यवस्थेच्या लक्षात आणून देण्यात अशा लढ्यांचे मोठे योगदान आहे. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि शांततेत जगण्याचा अधिकार आहे. उत्सव साजरा करण्याचा अधिकार जसा महत्त्वाचा आहे, तसाच इतरांना त्रास न देण्याचा अधिकारही महत्त्वाचा आहे.

म्हणूनच डीजेच्या आवाजाचा प्रश्न हा कोणत्याही धर्माच्या किंवा उत्सवाच्या विरोधाचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे आहे. हा प्रश्न सार्वजनिक आरोग्याचा, नागरिकांच्या शांततेचा, कायद्याच्या अंमलबजावणीचा आणि परस्परांच्या हक्कांचा आहे.

मोठा आवाज म्हणजे मोठा उत्सव नव्हे. मोठा उत्सव तोच, ज्यात आनंद मोठा असतो आणि दुसऱ्याचा त्रास शून्य असतो.

– **किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

चला मग! मुले-पुरुष वर्गालाही समजून घेऊया...

आयुष्यातील प्रत्येक वळणावर मुले-पुरुष हे संघर्ष करत आहेत. अगदी जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत पुरुषांचा संघर्ष आज शिगेला पोहोचला आहे. खरं पाहिलं तर कलियुगाच्या काळामध्ये लहान मुलगा, तरुणावस्था, प्रौढावस्था आणि म्हातारपण या सर्व स्तरातून जाताना पुरुषवर्ग अनेक संघर्षांशी सामना करत आहे. दगदगत्या जीवनात मानसिक, शारीरिक तसेच आर्थिक आणि भावनिक आपण पुरुष वर्गाला समजून घेतो का नाही? हा एक प्रश्न आहे. जर इतिहास बघितला तर पुरुषांनी नेहमी संघर्ष करत आपले वर्चस्व गाजवले आहे. इथे स्त्री महान का? पुरुष महान? पेक्षा दोघांचाही व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव या समाजावर काय पडला आहे, हे आज आपण जाणून घेऊया. पृथ्वीतलावर आलेले प्रत्येक व्यक्तीमहत्त्व पुरुष आणि स्त्री रूपात आपापल्या पद्धतीने जगण्यासाठी संघर्ष करत असतात. त्यातच पुरुषांना भारदस्तपणा, आकर्षक व्यक्ती महत्त्व तसे आक्रमकता तर कधी समजूतदारपणा या सर्व बाबीतून निहारले जाते. अशातच स्त्री आणि पुरुष ही रथाची दोन चाके आहेत, आणि ती व्यवस्थित चालायची असेल तर एकमेकांना समजून घेण्यात शिवाय पर्याय राहात नाही असे दिसून येते. आजच्या युगामध्ये मुले-पुरुष भावनिक होत चाललेले आहेत. काही ठिकाणी ते चुकतात ही. त्यांची चूक नाकारता येत नाही, परंतु परिस्थितीनुसार प्रत्येक मूल किंवा पुरुष चांगले व्यक्ती बनण्याचा प्रयत्न करतो, यात काही शंका नाही. प्रत्येकाच्या मनामध्ये एक समजूतदार आणि जबाबदार तसेच भावनिक कोपरा दडलेला आहे. आजच्या जीवनामध्ये भावनिक रित्या विचार करताना पुरुष वर्गाला सांभाळावे लागते, कारण समाजासमोर दिसणारा भारदस्तपणा आणि आकर्षक व्यक्तीमहत्त्व जरी या देवांनी पुरुषाला दिले आहे, तरी त्याचा भावनिक कोपरा सांभाळून घेण्याची जबाबदारी या जगाची आहे. यासाठी पुरुषांनी सुद्धा मनमोकळेपणाने गप्पा, संवाद, आनंद लुटणे आणि जीवनातील प्रत्येक गोष्ट सकारात्मक दृष्टीने घेणे गरजेचे आहे. अशातच कधीकधी मुले-पुरुष भावनिक होतात. चुकतात परंतु त्यातूनही ते पुन्हा उभा राहून आपल्या प्रियजनांसाठी सतत झगडत असतात. काही दुर्मिळ नकारात्मक घटनांमुळे सर्वच पुरुष वर्गाला नकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे नाही. काही मुले पुरुष आपले सर्वस्व आपल्या चाहत्यांसाठी देत असतात. लक्षात ठेवा प्रत्येक मुलगा हा बालपणापासून तरुणावस्थेत प्रौढावस्थेत आणि म्हातारपणी अनेक गोष्टींना सामोरे जातो, संकटांना सामोरे जातो तरीही तो मिश्किल हास्य देत दुसऱ्यांना खुश ठेवायचा प्रयत्न करतो, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. उत्तम मुलगा, भाऊ, मित्र, वडील, पती, सोबती या विविध रूपामध्ये आपल्या रंगछटा मांडत असतो. तुम्हीच त्याचे भावविश्व असता हे लक्षात असू द्या. त्यांनाही आज समजून घ्यायची गरज आहे. पुरुषांच्या मनामध्ये जो मानसिक ताण-तणाव, त्रास आणि नकारात्मकता घालवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजे. स्त्री आणि पुरुष यांच्यातील सुसंवाद नक्कीच एक सुखी जग निर्माण करेल, यात काही शंका नाही. मानसिक दृष्ट्या शारीरिक दृष्ट्या आणि आर्थिक दृष्ट्या पुरुषवर्गाच्या संघर्षार्ला खरंच सलाम केला पाहिजे. पण, ही बाब थोडी वेगळी असल्यामुळे हा विषय सर्वांपासून वंचित राहतो. शेवटी एवढेच सांगतो की या जगामध्ये महानपुरुषांपासून ते रोजच्या जीवनामध्ये संघर्ष करणाऱ्या पुरुष यांची जगानी परवा केली पाहिजे, तसेच प्रत्येकानी स्त्री आणि पुरुष वर्गार्ला त्यांच्या संघर्षाला आणि त्यांच्या बलिदानाला नमन केले पाहिजे, तेव्हा हे विश्व सुख अवस्था भोगेल हे नक्की.

ऋत्विज चव्हाण

मराठा आरक्षणासंदर्भात उच्चस्तरीय समितीची महत्त्वाची बैठक

छत्रपती संभाजीनगर, (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या विविध बाबींचा आढावा घेऊन कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी व अडचणींचे निराकरण, प्रलंबित प्रश्नांचा निपटारा तसेच आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक उद्या, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत क्षेत्रीय स्तरावरील विविध बाबींचा सखोल आढावा घेऊन पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज येथे दिली.

आज विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मराठा आरक्षणसंदर्भातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील, विभागातील सातही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक तसेच सर्व उपविभागीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

आमदार प्रसाद लाड, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी विनय गौडा, जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जालना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित होते.

बैठकीत मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीसह इतर संलग्न बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. क्षेत्रीय स्तरावरील विविध बाबी, उपलब्ध माहिती, नोंदी तसेच संबंधित प्रक्रियेतील अडचणी याबाबतही चर्चा करण्यात आली.

दि. ९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या उच्चस्तरीय समितीच्या बैठकीस मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील, मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत, आमदार प्रसाद लाड, समितीचे सदस्य, विभागातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस अधीक्षक तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि सर्व जिल्ह्यांतील जात पडताळणी समित्यांचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत.

मतदार यादीबाबत कायदेशीर तरतुदी व कार्यपद्धतीचे प्रशिक्षण

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) २०२६ अंतर्गत मतदार यादीच्या कामकाजासाठी नियुक्त मतदार नोंदणी अधिकारी (ERO) व सहायक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांचे कायदेशीर तरतुदी व कार्यपद्धतीबाबत प्रशिक्षण जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले.

या प्रशिक्षणास उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, सदाशिव पडदुने, सुमित शिंदे, विजया पांगारकर, जयश्री आव्हाड, सचिन इथापे यांच्यासह सर्व तहसीलदार उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन म्हणाले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ERO व AERO यांना सोपविण्यात आलेले काम काटेकोरपणे व पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावे. कोणत्याही मतदाराला त्रास होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. कागदपत्रांची पडताळणी करून त्याबाबतची कारणे लेखी स्वरूपात नोंदवावीत तसेच मतदारांचे आक्षेप समजून घेऊन नियमानुसार कार्यवाही करावी.

जिल्ह्यात नव्याने तयार करण्यात आलेल्या 17 मतदान केंद्रांशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी परस्पर समन्वय ठेवून कामकाज पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने करावे. या प्रक्रियेत कोणताही पात्र मतदार वगळला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. कामकाज सुलभ होण्याबरोबरच मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याकडे विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

SIR प्रक्रियेत पहिल्या महिन्यात Unmapped अर्थात अद्याप मॅपिंग न झालेल्या मतदारांची तसेच Anomalies अर्थात विसंगतींची प्रक्रिया पूर्ण करावी. दुसऱ्या महिन्यात नमुना अर्ज क्रमांक 6, 7 व 8 संदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी. इछड मार्फत आवश्यक कागदपत्रे जमा करून घेतल्यानंतर पुढील कार्यवाही करावी. काही अडचणी निर्माण झाल्या तरी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता निष्पक्ष व तटस्थपणे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केले.

४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादीचे प्रकाशन

उपजिल्हाधिकारी सदाशिव पडदुने यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना सांगितले की, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) २०२६ अंतर्गत अंतिम मतदार यादीचे प्रकाशन 4 नोव्हेंबर 2026 रोजी करण्यात येणार आहे. यावेळी त्यांनी भारतीय संविधानातील अनुच्छेद 324 ते 329 मधील निवडणूकविषयक तरतुदींची माहिती दिली.

तसेच वैधानिक तरतुदी व संबंधित नमुने, मतदारांचे प्रकार, मतदार यादी व्यवस्थापनाची प्रशासकीय यंत्रणा, मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्रता व अपात्रता, मतदार यादीचे पुनरीक्षण, मतदार यादीची भाषा व रचना आदी विषयांची माहिती ERO व AERO यांना पॉवरपॉइंट सादरीकरणाद्वारे देण्यात आली.

सुनावणीची दैनंदिन नोंद ठेवण्याच्या सूचना

प्रांत अधिकारी अकलूज तथा मतदार नोंदणी अधिकारी, माळशिरस विजया पांगारकर यांनी सुनावणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मतदाराला नाव, पत्ता किंवा इतर तपशीलांमध्ये दुरुस्ती करावयाची असल्यास त्याच्याकडून आवश्यक पुरावे घ्यावेत. संबंधित कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर मूळ कागदपत्र तपासून त्याची छायांकित प्रत कार्यालयीन अभिलेखासाठी जतन करावी, असे त्यांनी सांगितले.

महसूल मंडळ कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालयात सुनावणी घेता येईल. प्रत्येक सुनावणीची तारीख, वेळ व ठिकाण पूर्वनियोजित करावे. एका दिवसात 150 सुनावणी घेता येतील. तीन वेळापत्रकांमध्ये प्रत्येकी 50 सुनावणी अशा पद्धतीने सुनावणीचे नियोजन करावे. सुनावणी प्रक्रियेसाठी आवश्यक इंटरनेट सुविधा उपलब्ध करून घेऊन स्वतंत्र टीम तयार करावी. दररोजच्या सुनावणीच्या नोंदी त्याच दिवशी अद्ययावत कराव्यात, असेही श्रीमती पांगारकर यांनी स्पष्ट केले.

मतदाराला नोटीस देताना त्याची पोहोच घ्यावी व त्याची पडताळणी AERO यांनी करावी. सुनावणीच्या वेळी मतदाराच्या आई-वडिलांच्या नावासंदर्भातील आवश्यक पुरावे तपासावेत. प्रत्येक कागदपत्राची खातरजमा करून त्याची छायांकित प्रत अभिलेखात ठेवावी. तसेच मतदाराचा फोटो व नोटीसचा फोटो अपलोड करावा. दैनंदिन कामकाजाचा डेटा डाउनलोड करून सुरक्षितपणे जतन करावा. यासाठी स्वतंत्र टीम नियुक्त करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मतदाराच्या कागदपत्रांमध्ये शाळा सोडल्याचा दाखला हा महत्त्वाचा पुरावा असल्याचे त्यांनी नमूद केले. सुनावणीच्या वेळी मतदार गैरहजर राहिल्यास दुसरी सुनावणी घेण्यात यावी. त्यानंतरही गैरहजर राहिल्यास तिसरी सुनावणी घ्यावी. तिसऱ्या सुनावणीनंतरही मतदार गैरहजर राहिल्यास निर्णय घेण्याची घाई करू नये. संपूर्ण कामकाजाची ऑब्झर्वरमार्फत तपासणी केली जाते. त्यामुळे इछड, एफ्ह व AERO यांनी प्रत्येक टप्प्यावर काळजीपूर्वक काम करावे, असे श्रीमती पांगारकर यांनी सांगितले.

सुनावणीदरम्यान प्राप्त झालेल्या कागदपत्रांची संख्या व त्यांची नोंद यांची खातरजमा करावी. रोजनामा फाईल तयार करून प्रत्येक पानाला क्रमांक द्यावा. संपूर्ण प्रक्रियेतील प्रत्येक बाबीची बारकाईने पडताळणी करून व्यवस्थित अभिलेख व नोंदी ठेवाव्यात, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. प्रांताधिकारी सदाशिव पडदुने व प्रांत अधिकारी विजया पांगारकर यांनी सर्व मतदार नोंदणी अधिकारी आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांचे सविस्तर प्रशिक्षण घेतले.

पान १ वरून

प्रत्येक पात्र मतदाराचे नाव...

संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. विहित कालावधीत प्रत्येक प्रक्रिया पूर्ण करण्यासोबतच पात्र मतदारांचा मताधिकार अबाधित राहील, याची विशेष दक्षता घ्यावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

महाविद्यालयांत जाऊन नवमतदारांची नोंदणी करा

नवीन मतदार नोंदणीसाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. १८ ते १९ वर्षे वयोगटातील नवमतदारांची नोंदणी वाढविण्यासाठी महाविद्यालयांना भेटी देऊन पात्र विद्यार्थ्यांची मतदार म्हणून नोंदणी करावी. पात्र असूनही एकही नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही, यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन करून विशेष जनजागृती उपक्रम राबवावेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्हा प्रशासनाने एसआयआर अंतर्गत केलेल्या कामकाजाची सविस्तर माहिती बैठकीत सादर केली. तसेच अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे यांनीही मार्गदर्शन केले.

सेफ-टेक पुरस्कार २०२६ मध्ये सोलापूर जिल्ह्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि बचावकार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अधिकारी, व्यक्ती व संस्थांचा मुंबई येथे आयोजित सहाव्या 'सेफ-टेक पुरस्कार, परिषद व प्रदर्शन २०२६'मध्ये गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यात सोलापूर जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उत्कृष्ट कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत जिल्ह्याला एकूण सहा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

किंग्ज एक्सप्लो मीडिया यांच्या वतीने ३ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबईतील हॉटेल ताज येथे 'सहावा सेफ-टेक पुरस्कार, परिषद व प्रदर्शन २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, अग्निशमन आणि बचावकार्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या १३५ अधिकारी, व्यक्ती व संस्थांचा या वेळी गौरव करण्यात आला.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांचा विशेष सन्मान

सोलापूर जिल्ह्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांना 'बेस्ट ऑफिसर' या विभागात 'बेस्ट फायर फायटर अँड रेस्क्युअर ऑफ द इयर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आपत्तीच्या काळात तत्परतेने कार्यवाही करणे, बचावकार्याचे प्रभावी नियोजन आणि विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये केलेल्या उल्लेखनीय

कामगिरीची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डीआरएफच्या जवानांचाही राष्ट्रीय स्तरावर गौरव

सोलापूर जिल्हा आपत्ती प्रतिसाद दलातील (डीआरएफ) बजरंग होटकर, रामचंद्र वाघमारे, सागर धप्पाधुळे, शुभांगी गवते आणि अरुणा राठोड यांना पूरपरिस्थितीतील बचावकार्य, आग प्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन बचावकार्य तसेच गर्दी नियंत्रणामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'फर्स्ट रिस्पॉन्डर अँड रेस्क्युअर' या विभागात 'बेस्ट फायर फायटर अँड रेस्क्युअर ऑफ द इयर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

तत्परता, धैर्य आणि सेवाभावाची राष्ट्रीय स्तरावर दखल

आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध प्रसंगी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागातील अधिकारी आणि डीआरएफच्या जवानांनी तत्परता, धैर्य, शिस्त आणि सेवाभावाने काम केले आहे. पूर, आग, गर्दी नियंत्रण तसेच अन्य आपत्कालीन परिस्थितींमध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत करण्यात आलेल्या कायार्ची या पुरस्कारांच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडून अभिनंदन

सोलापूर जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला मिळालेल्या या सन्मानाबद्दल निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले तसेच डीआरएफच्या सर्व स्वयंसेवकांचे अभिनंदन केले. आपत्तीच्या काळात नागरिकांच्या मदतीसाठी तत्पर राहून केलेल्या कायार्चे कौतुक करून त्यांनी अधिकारी व जवानांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सहा पुरस्कारांमुळे सोलापूर जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कार्यक्षमतेसह अधिकारी आणि बचाव पथकाच्या सेवाभावी कायार्ला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली असून, हा सन्मान जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरला आहे.

वात्रटिका

आशा लावून बघा

इथं पाऊस पडेना आणि
आमच्या तोंडचे पळाले पाणी...
तरीही कोणाला उत्सुकता
बाबा वेंगांची भविष्यवाणी...
वर्तमान धोक्यात आला आहे
तिथे भविष्य काय पहावे...
नेत्यांना फुरसत नाही थोडीही
ढगाकडे, नेत्यांकडे आशेने बघावे

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील स्नेहा गायकवाड हिचे जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत यश

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थिनी कुमारी स्नेहा गायकवाड हिने दयानंद कॉमर्स कॉलेज सोलापूर येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले.

दयानंद कॉमर्स कॉलेज यांच्या वतीने जिल्हास्तरीय आयोजित करण्यात आलेल्या इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील 57 विद्यार्थी सहभागी झाले होते.

कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कुमारी स्नेहा गायकवाड बीएससी भाग 1 मुस्कान शेख व सपना चेंडके

बीए भाग 1 यांनी या वक्तृत्व स्पर्धेत सहभाग नोंदविला होता, पैकी स्नेहा गायकवाड, राहणार कोन्हाळी या विद्यार्थिनींनी स्पर्धेमध्ये नैपुण्य दाखवून क्रमांक पटकावला तिला इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. संयोजक प्राचार्य डॉ शिवाजीराव शिंदे यांनी तिच्या वाक् चातुर्य विषयी विशेष कौतुक केले.

या यशाबद्दल संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी ताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, समन्वयक पूनम कोकळगी, रुपाली शहा, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले.

कु स्नेहा गायकवाड हिचे यश कौतुकास्पद

ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासोबतच सांस्कृतिक व बौद्धिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे ही महाविद्यालयीन व्यवस्थापनाची जबाबदारी असते या भूमिकेतूनच इंग्रजी वक्तृत्व स्पधेर्तील स्नेहा गायकवाड हिने संपादन केलेले यश कौतुकास्पद आहे असे मत शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

असुरक्षित स्पर्श हा कायद्याने गुन्हा; विद्यार्थ्यांनी सुरक्षिततेबाबत जागरूक राहावे - न्यायाधीश देशपांडे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- किशोरवयात प्रवेश करताना मुला-मुलींना सुरक्षित आणि असुरक्षित स्पशार्तील फरक समजणे अत्यंत आवश्यक आहे. असुरक्षित स्पर्श हा अनुचित वर्तन असून, परिस्थितीनुसार तो कायद्याच्या कक्षेत येणारा गंभीर गुन्हा ठरू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जागरूक राहून कोणत्याही अनुचित प्रकाराला घाबरून न जाता विश्वासू व्यक्ती किंवा संबंधित यंत्रणेकडे माहिती द्यावी, असे प्रतिपादन न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने झोपडपट्टी भागातील वस्तीपातळीवरील सह्याद्री प्राथमिक शाळेत सुरक्षित-असुरक्षित स्पर्श, लैंगिक गुन्हेगारी आणि पोक्सो कायदा या विषयावर कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी न्यायाधीश अमोलकुमार देशपांडे मार्गदर्शन करत होते.

कार्यक्रमास . चैतन्य केंगार, ॲड. अनुराधा कदम, लक्ष्मण पाटील, मुख्याध्यापिका फरजाना अत्तार, प्राचार्य नारायण जगताप, माऊली अवताडे आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची, कायदेशीर संरक्षणाची तसेच अडचणीच्या प्रसंगी उपलब्ध असलेल्या मदतीची माहिती देण्यात आली. बालकांचे हक्क आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा याबाबत ॲड. लक्ष्मण पाटील यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या मोफत विधी सेवा, कायदेविषयक सल्ला व सहाय्याबाबत ॲड. चैतन्य केंगार यांनी माहिती दिली.

शिक्षणाचा अधिकार या विषयावर ॲड. अनुराधा कदम यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमादरम्यान विविध प्रश्न उपस्थित केले. प्रश्नोत्तराच्या माध्यमातून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

बालकांमध्ये लहान वयापासूनच सुरक्षिततेची जाणीव आणि कायदेविषयक सजगता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला, असे मत मुख्याध्यापिका फरजाना अत्तार व माऊली अवताडे यांनी व्यक्त केले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव अमोलकुमार देशपांडे यांच्या देखरेखीखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिकारी-कर्मचारी व विधी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी घेतला आढावा

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- विशेष सखोल पुनरीक्षण (SIR)-२०२६ कार्यक्रमांतर्गत भारत निवडणूक आयोग नियुक्त मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी सोलापूर उत्तर तहसील कार्यालय तसेच सिद्धेश्वर प्रशाला येथील मतदान केंद्रास भेट देऊन विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

उत्तर तहसील कार्यालयात विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून एसआयआर कामकाजाची माहिती घेतली. या कामकाजादरम्यान येणाऱ्या

अडचणी, मतदारांची ओळख पटविण्यासाठी आवश्यक पुरावे, स्थलांतरित नागरिक, भारतीय नागरिकत्व तसेच जन्मतारखेच्या पुराव्यांबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

विशेष सखोल पुनरीक्षण हे महत्त्वपूर्ण निवडणूक कामकाज असल्याने कोणत्याही प्रकारची टाळाटाळ अथवा गैरवर्तन न करता प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. तसेच सुनावणीचे काम निर्धारित वेळापत्रकानुसार त्याच दिवशी पूर्ण करावे आणि या संपूर्ण कामकाजाशी संबंधित कागदपत्रे व्यवस्थित व सुरक्षितपणे जतन करावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांनी विभागीय आयुक्तांना विशेष सखोल उत्तर तहसील कार्यालय येथे पुनरीक्षणाच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली.

यानंतर विभागीय आयुक्तांनी सोलापूर शहर उत्तर, शहर मध्य, शहर दक्षिण या मतदारसंघाच्या निवडणूक नोंदणी अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला तसेच सिद्धेश्वर प्रशाला येथील मतदान केंद्रास भेट देऊन तेथील विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, प्रांताधिकारी सदाशिव पडधुने, प्रांताधिकारी सुमित शिंदे, नगर प्रशासन अधिकारी आशिष लोकरे, उपायुक्त संदीप कारंजे, तहसीलदार निलेश पाटील तसेच उत्तर विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्टार ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात १२१ वृक्षांचे वृक्षारोपण

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- बँक ऑफ इंडियाच्या १२१ व्या वर्धापन दिनानिमित्त सोलापूर विभागीय कार्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्टार ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात १२१ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमांमध्ये बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी वॉकथॉन, रक्तदान शिबिर तसेच बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

वर्धापन दिनानिमित्त सायंकाळी कर्मचारी आणि ग्राहकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच स्टार ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेच्या परिसरात १२१ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, विभागीय सामाजिक वनीकरण अधिकारी लक्ष्मण आवारे, जिल्हा परिषद ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप आणि जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास विभागीय अधिकारी मानस झा, उपविभागीय अधिकारी एन. व्ही. राव, उपविभागीय अधिकारी (रिकव्हरी) प्रेमचंद, नाबार्डचे व्यवस्थापक नितीन शेळके, अमोल सांगळे, विश्वास वेताळ, दीपक वडेवाले, उमेदचे जिल्हा व्यवस्थापक सचिन चवरे यांच्यासह बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहक उपस्थित होते.

यावेळी विभागीय अधिकारी मानस झा यांनी बँक ऑफ इंडियाच्या विविध ग्राहकाभिमुख योजना आणि सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. सामाजिक बांधिलकी, ग्राहकसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बँक ऑफ इंडियाचा १२१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

जाहिर प्रसिध्दीकरण मृत्यू नोंदणी अर्ज क्र.५६०/२०२६

मोहोळ येथील मा. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात

तायप्पा भारत धनवे } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत अधिकारी, } सामनेवाला
ग्रामपंचायत इंचगाव, ता. मोहोळ

ज्याअर्थी, अर्जदाराची आजी व्दारकाबाई मच्छिंद्र धनवे हे दि. १३/०४/२००७ रोजी इंचगाव येथे अरण पावले आहेत, तिच्या मृत्यूची नोंद इंचाव येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मृत्यू तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणीव अर्जदारांना नव्हती. त्यामुळे सदरी बोंद करण्याचा आदेश ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळिवण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराची आजी व्दारकाबाई मच्छिंद्र धनवे हे दि. १३/०४/२००७ रोजी मयत झाल्यामुळे तिच्या मृत्यूची नोंद इंचगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना मयत - व्दारकाबाई मच्छिंद्र धनवे हे दि. १३/०४/२००७ रोजी मरण पावल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.ही जाहीर नोटीस दि. ०८/०९/२०२६

शिक्का

सही/-
तहसिलदार,मोहोळ.

जाहिर प्रसिध्दीकरण मृत्यू नोंदणी अर्ज क्र.५५९/२०२६

मोहोळ येथील मा. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात

अरुणा सुधाकर सरवळे } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत अधिकारी, } सामनेवाला
ग्रामपंचायत इंचगाव, ता. मोहोळ

ज्याअर्थी, अर्जदाराचे वडील- रामचंद्र मच्छिंद्र धनवे हे दि. १२/१०/२०२४ रोजी इंचगाव येथे मरण पावले आहेत. तिच्या मृत्यूची नोंद इंचगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मृत्यू तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणीव अर्जदारांना नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळिवण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे वडील- रामचंद्र मच्छिंद्र धनवे हे दि. १२/१०/२०२४ रोजी मयत झाल्यामुळे तिच्या मृत्यूची नोंद इंचगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना मयत रामचंद्र मच्छिंद्र धनवे हे दि. १२/१०/२०२४ रोजी मरण पावल्याची नोंद घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळिवण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे वडील- रामचंद्र मच्छिंद्र धनवे हे दि. १२/१०/२०२४ रोजी इंचगाव येथे मरण पावले आहेत. तिच्या मृत्यूची नोंद इंचगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मृत्यू तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणीव अर्जदारांना नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळिवण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे वडील- रामचंद्र मच्छिंद्र धनवे हे दि. १२/१०/२०२४ रोजी मयत झाल्यामुळे तिच्या मृत्यूची नोंद इंचगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंचगाव यांना मयत रामचंद्र मच्छिंद्र धनवे हे दि. १२/१०/२०२४ रोजी मरण पावल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.ही जाहीर नोटीस दि. ०८/०९/२०२६

शिक्का

सही/-
तहसिलदार,मोहोळ.

सामाजिक संस्थांनी वृक्ष संवर्धन मोहीम राबवावी- रूपाली शहा

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- वृक्षामुळे प्राणवायू, सावली, फळे, औषधे आणि अनेक जीवांना निवारा मिळतो. त्यामुळे वृक्षतोड थांबून झाडाचे रक्षण करण्यासाठी सामाजिक संस्थांनी वृक्ष संवर्धनाची मोहिमा राबवावी असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या रूपाली शहा यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुल व सोलापूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पंधरवडा निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, समता दूत सौ नालंदा चंदनशिवे, प्रकल्प अधिकारी सौ प्रणिता कांबळे, पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

पुढे त्या म्हणाल्या की, झाडांची योग्य निगा राखण्यासाठी कुंपण घालणे, नियमित पाणी देणे, खत घालणे, छाटणी करणे आधी प्रकल्प राबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत

प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे म्हणाल्या की' झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश प्रत्येकाने आचरणात आणल्यास भविष्यात हिरवेगार आणि निरोगी पर्यावरण निर्माण होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ नालंदा चंदनशिवे यांनी केले आभार राजेंद्र गवळी यांनी मानले कार्यक्रमास प्रा सौरभ भस्मे प्रा भीम सोनकांबळे, मुख्याध्यापक सुरेश आवटे, बाबुशा मंगरुळे, प्रतिभा माने हे उपस्थित होते.

समाजोपयोगी वृक्षाची लागवड

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने चिंच, आंबा, लिंबू व शेवगा आदी समाज उपयोगी वृक्षाची लागवड सामाजिक कार्यकर्त्या रूपाली शहा यांच्या हस्ते करण्यात आले. नालंदा चंदनशिवे यांनी वृक्षाचे महत्त्व विशद केले.

'गोविंदा रे गोपाळा...' च्या गजरात एस.एन.डी. इंटरनॅशनल स्कूलमध्ये गोपालांची दहीहंडी!

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून एस.एन.डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलच्या प्राथमिक विभागाच्या वतीने बालगोपालांच्या उत्साहात दहीहंडी उत्सव मोठ्या आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या वेळी प्राथमिक विभागातील अनेक विद्यार्थी राधा, कृष्ण व गोपाल यांच्या आकर्षक वेशभूषेत शाळेत दाखल झाले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या मनमोहक वेशभूषेमुळे शाळेच्या परिसरात जणू गोकुळ अवतरल्याचे सुंदर चित्र पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत श्रीकृष्णाच्या बाललीलांचा आनंद घेत वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण केले.ह्यगोविंदा

रे गोपाळा, गोविंदा आला रे आलाह्ण या गाण्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी जल्लोष करत दहीहंडी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. बालगोपालांनी एकत्र येत दहीहंडी फोडताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोष करून आनंद व्यक्त केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि सण-उत्सवांचे महत्त्व अनुभवातून समजावून देण्यात आले.या कार्यक्रमास स्कूलचे मुख्याध्यापक संदीप पानसरे, उपमुख्याध्यापक शकूर पटेल, पीआरओ मनोज राऊत तसेच प्राथमिक विभाग प्रमुख नीलम डोंबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दहीहंडी उत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शिक्षिका वंदना गरगडे, निषा जाधव, जयश्री एकळ, कविता माने, अदिती भगरे, अवनी गोखले, श्वेता मोहिते, मनिषा राऊत, प्रियंका करे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दहीहंडी उत्सवाला आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक रंगत प्राप्त झाली.

निमगाव टें येथील मंगल शिंदे यांचा दगड कोसळून मृत्यू

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- केदारनाथ धाम यात्रेदरम्यान गौरीकुंड-केदारनाथ पायी मार्गावर डोंगरावरून अचानक दगड कोसळल्याने माढा तालुक्यातील निमगाव टें येथील मंगल अप्पाराव शिंदे (वय ६०) यांचा दुदैर्वी मृत्यू झाला. रविवारी (६ सप्टेंबर) चीरबासा हेलिपॅडजवळ ही दुर्घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेत मंगल शिंदे यांना तातडीने गौरीकुंड प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. माढा तालुक्यातील महिलेचा केदारनाथ यात्रेदरम्यान झालेल्या या दुदैर्वी घटनेने निमगाव टें परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच माढा तालुक्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे यांनी तातडीने पुढाकार घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी या दुर्घटनेची माहिती देऊन केदारनाथ येथील प्रशासनाशी तातडीने संपर्क साधून आवश्यक आदेश देण्याची विनंती केली. मंगल शिंदे यांना घटनास्थळावरून सुरक्षितपणे आणण्यासाठी तसेच त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक ती मदत मिळावी यासाठी बबनदादा शिंदे यांनी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत प्रयत्न केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ, डीडीआरएफ आणि पोलिसांच्या बचाव पथकांनी चीरबासा हेलिपॅड परिसरात धाव घेतली. जखमी मंगल शिंदे यांना गौरीकुंड प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले; मात्र त्यांचा मृत्यू झाला. प्रशासनाकडून पंचनामा व आवश्यक वैधानिक कार्यवाही करण्यात आली असून घटनेची माहिती त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आली आहे. आज निमगाव टें येथे त्यांचा अंत्यविधी करण्यात आला.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.

मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

उमेश माने
मो. 9353370779

रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

आडवे शब्द : १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

सुडोकु - 51

				6	5	9	2	8
1		5		2		7	6	
		2	8					
5	3		4	8	9			
6	4		7			8	3	
		7		1			4	9
4	9				8	1	5	7
	1	8				3		
				9	1	2		

पंढरपुरात सकल मराठा समाजाचा आक्रोश; सरकारला थेट इशारा

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- मनोज जरांगे यांच्या उपोषणाची तत्काळ दखल घेऊन राज्यात सापडलेल्या कुणबी नोंदींच्या आधारे मराठा समाज बांधवांना कुणबी दाखले देण्यात यावेत, तसेच सातारा गॅझेट लागू करण्यात यावे, या मागण्यांसाठी पंढरपुरात सकल मराठा समाजाच्या वतीने आक्रोश आंदोलन करण्यात आले. शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. तसेच महाराष्ट्रात मंत्री, खासदार अथवा आमदारांना फिरू दिले जाणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला.

पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी 'एक मराठा, लाख मराठा'अशा घोषणा देत समाजबांधवांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.

राज्यात सापडलेल्या सुमारे ५८ लाख कुणबी नोंदींच्या आधारे पात्र मराठा समाज बांधवांना कुणबी दाखले देण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली. तसेच सातारा गॅझेट लागू करून मराठा समाजाच्या मागण्यांची पूर्तता करावी, अशी मागणीही करण्यात आली.

शासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलनाची व्याप्ती वाढविण्यात येईल. गरज पडल्यास मुंबईकडे कूच करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. मागण्या मान्य न झाल्यास मंत्री, खासदार आणि आमदारांना महाराष्ट्रात फिरू न देण्याची भूमिका आंदोलकांनी व्यक्त केली.

आंदोलनादरम्यान सकल मराठा समाजाच्या वतीने नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांना निवेदन देण्यात आले. शासनाने मराठा समाजाच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी संदीप मांडवे, नागेश काका भोसले, शशिकांत पाटील, किरण घाडगे, राजश्री पवार, नितीन आसबे यांच्यासह मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात काही काळ वातावरण तापले होते.

पोलिसांनी यावेळी चोख बंदोबस्त ठेवला होता.

पात्र मतदाराच्या समावेशासाठी राजकीय पक्षांनीही सहकार्य करावे- शितल तेली-उगले

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्यासह इतर 13 राज्यांमध्ये सुरू केलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल परीक्षण कार्यक्रम अंतर्गत मतदार याद्यांचे शुद्धीकरण केले जात आहे. मतदार यादीत प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश करणे तसेच अपात्र नागरिकाला मतदार यादीतून वगळणे हा कार्यक्रमाचा उद्देश आहे. तरी सोलापूर जिल्ह्याच्या मतदार यादीत एसआयआर अंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाचा समावेश होण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनीही सहकार्य करावे, असे आवाहन मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत राजकीय पक्षाच्या प्रतिनिधी सोबत आयोजित आढावा बैठकीत श्रीमती तेली उगले मार्गदर्शन करत होत्या. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, अप्पर आयुक्त तथा मतदार यादीचे नोडल अधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी लक्ष्मण कसेकर, यांच्यासह सर्व मतदार नोंदणी अधिकारी तसेच प्रमुख राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मतदार नोंदणी निरीक्षक श्रीमती तेली उगले पुढे म्हणाल्या की, सोलापूर जिल्ह्याची मतदार यादी अंतिम करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी प्रशासनाला सहकार्य करावे. राजकीय पक्षांचे बीएलए हे बूथ लेवल ऑफिसर यांना मदत करतच आहेत. तसेच राजकीय पक्षांनी ज्यांची नावे सध्याच्या प्रारूप मतदार यादीत नाहीत अशा लोकांचे एक गठ्ठ्याने अर्ज आणून देऊ नये, तसे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याबाबत काळजी घ्यावी, असेही त्यांनी सुचित केले. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचा मतदारांना मतदान यादीतून वगळणे हा हेतू नसून मतदार याद्यांचे शुद्धीकरण करणे हा हेतू आहे. त्यामुळे एकही पात्र मतदार यादीतून वगळला जाणार नाही या दृष्टीने सर्व मतदान नोंदणी अधिकारी तसेच बीएलओ काम करत आहेत. तसेच या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करताना सोबत पुरावे ही सादर करावेत, असेही श्रीमती तेली उगले यांनी सांगितले. मतदार यादी निरीक्षक म्हणून भारत निवडणूक आयोगाने आपली नियुक्ती केली असून सोलापूर जिल्ह्यात या अंतर्गत तीन वेळा भेट दिली जाणार असून राजकीय पक्षांनी त्यांच्या काही समस्या अडचणी असतील तर त्या वेळोवेळी मांडाव्यात, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रारंभी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी जिल्हा प्रशासनाने एसआयरअंतर्गत केलेल्या कामकाजाची माहिती दिली.जिल्ह्यात 17 जून 2026 रोजी एकूण मतदार संख्या 39,41,095 इतकी होती. विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत मतदारांची संख्या 33,18,424 इतकी झाली आहे. या प्रारूप यादीसोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या ASDD यादीत 6,22,671 मतदारांचा समावेश आहे. अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच जिल्ह्यात यापूर्वी 3,723 मतदान केंद्रे होती. त्यामध्ये 17 नवीन मतदान केंद्रांची वाढ झाली असून, आता जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रांची संख्या 3,740 झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.

राजकीय पक्षांच्या सूचना, प्रश्न-

बैठकीत उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी मतदार यादीत अनुपस्थित अथवा स्थलांतरित झालेल्या मतदारांना पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही कशी करणार, तसेच एकाच कुटुंबातील सदस्यांचे मतदान एकाच मतदान केंद्रावर राहावे, मतदार यादी अचूक करावयात, पात्र मतदार वगळले जाणार नाहीत या दृष्टीने प्रशासनाने सजग राहावे. तसेच मतदार यादी शुद्धीकरणासाठी प्रशासनाला राजकीय पक्षांनी तसेच प्रत्येक पक्षाच्या बुथ लेवल असिस्टंट यांनी सहकार्य केले असून ते तसेच पुढेही करतील असे सांगितले.

SIR कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक-

जिल्ह्यातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमासाठी सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत गृहभेटी 30 जून ते 17 ऑगस्ट 2026 या कालावधीत घेण्यात आल्या. मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना 24 ऑगस्ट 2026 रोजी करण्यात आली. प्रारूप मतदार यादी 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, दावे व हरकती दाखल करण्यासाठी 30 सप्टेंबर 2026 पर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर 29 ऑक्टोबर 2026 पर्यंत सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी प्रसिद्ध होणार आहे.

अहिल्यादेवी पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

३ कोटी ७५ लाखांच्या ठेवी; सभासदांना १० टक्के लाभांश

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- येथील अहिल्यादेवी पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रघुनाथराव कवितके यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. यावेळी संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेत सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.सभेस प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे तसेच माजी सरपंच रावसाहेब पांढरे उपस्थित होते. उपाध्यक्ष अमोल उराडे, संचालक हनुमंत ढालपे, रमजान बागवान, दत्तात्रय गजाकस, अतुल बावकर, दिलीप लाळगे, भारत उराडे, निखिल ठोंबरे, नवनाथ ठोंबरे, सुरेश पांढरे तसेच सचिव रवींद्र ठोंबरे यांच्यासह सभासद, ठेवीदार व कर्जदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.सचिव रवींद्र ठोंबरे यांनी संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा अहवाल सादर केला. भारत उराडे यांनी प्रास्ताविक केले, तर रावसाहेब पांढरे यांनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात रघुनाथराव कवितके म्हणाले, 'सुमारे ३४ वर्षांपूर्वी बहुजन समाजातील तरुणांसाठी ही संस्था उभी केली. आज संस्थेमुळे बाजारपेठेत अनेक तरुण आपापल्या व्यवसायात ठामपणे उभे आहेत. संस्थेच्या माध्यमातून ठेवी गोळा करणे व कर्जवाटप करण्याबरोबरच सामाजिक कार्यातही आपण अग्रेसर आहोत. सलग ३४ वर्षे निष्ठेने संस्था चालविणे ही महत्त्वाची बाब आहे. तरुणांनी पुढे येऊन सामाजिक कार्य तसेच व्यापारात अग्रेसर राहणे गरजेचे आहे.संस्थेचे भागभांडवल ३१ लाख रुपये, राखीव निधी ७५ लाख रुपये, ठेवी ३ कोटी ७५ लाख रुपये, येणे कर्ज ३ कोटी २१ लाख रुपये, गुंतवणूक १ कोटी ५० लाख रुपये, तर खेळते भांडवल ५ कोटी रुपये आहे. संस्थेला वर्षभरात ५ लाख ५२ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याचे चेअरमन रघुनाथराव कवितके यांनी सांगून सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रकाश पद्मन यांनी आभार मानले. सभासद, ठेवीदार व कर्जदारांच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

स्वेरीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष साजरे

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- समाजात प्रेम, समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने 'ज्ञान माऊली' या भक्तिमय संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष राज्यभर उत्साहात साजरे करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून स्वेरीमध्येही या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला भाविक, विद्यार्थी आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकारातून 'ज्ञान माऊली' या अभिनव संकल्पनेची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानुसार ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी स्वेरीच्या खुल्या रंगमंचावर या भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवनकार्य, साहित्य, विचार आणि आध्यात्मिक संदेश संगीत, अभंग, नृत्य, नाट्य आणि विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून उपस्थितांसमोर मांडण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगांनी आणि भक्तिमय सादरीकरणाने कार्यक्रमस्थळी आध्यात्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शर्वरी कुलकर्णी यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार आणि महान साहित्य येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे असल्याचे सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी मांडलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, 'मैत्र जीवांचे' ही बंधुभावाची भावना, विश्वकल्याणाची संकल्पना आणि भूतदया यांचे महत्त्व आजच्या काळातही तितकेच आहे, असे त्यांनी नमूद केले.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मवर्षानिमित्त राज्यातील विविध भागांमध्ये एकाच वेळी आयोजित करण्यात आलेल्या 'ज्ञान माऊली'कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा जागर करण्यासाठी आयोजित हा उपक्रम संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमास पंढरपूर पंचक्रोशीतील भाविक, वारकरी बांधव, नागरिक, रसिक तसेच इंकार कुलकर्णी, रूपक कुलकर्णी, पियुष आवारे, सर्वदा मोहोळकर, कौस्तुभ चांगभले, जयेश कुलकर्णी, आदिता कुलकर्णी, वेणूगोपाळ संगीत विद्यालयातील कलावंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक धीरज साळुंखे यांच्यासह स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे (ऑटोनॉमस) प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील विविध शाखांचे प्राचार्य, उपप्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. एन. ए. तळवलकर यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

माढ्यात शेतकऱ्यांकडून शक्तिपीठच्या नोटिसांची होळी

माढा (कटूसत्य वृत्त):- शक्तिपीठ महामार्गासाठी करण्यात येणाऱ्या भूसंपादनाला माढा तालुक्यातील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या नोटिसांची खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत होळी करून प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन देण्यास विरोध दर्शविला. शक्तिपीठ महामार्गासाठी माढा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, संबंधित शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. मात्र, या जमिनी शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा मुख्य आधार असल्याने त्या संपादित झाल्यास कुटुंबांच्या भवितव्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. शेतकऱ्यांची संमती आणि भूमिका विचारात न घेता भूसंपादनाची प्रक्रिया पुढे नेऊ नये. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून या प्रक्रियेचा फेरविचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यासंदर्भात माढ्याचे तहसीलदार संजय भोसले यांच्याकडे निवेदनही देण्यात आले.

कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल : मोहिते-पाटील

यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी प्रशासनाला आक्रमक इशारा दिला. शेतकऱ्यांचा विरोध डावलून भूसंपादनाची प्रक्रिया रेटण्याचा प्रयत्न केल्यास कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांवर अन्याय करून कोणतीही कारवाई करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला तीव्र विरोध केला जाईल, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

नोटिसा रद्द करून दिलासा देण्याची मागणी

भूसंपादनाच्या नोटिसांची होळी करत शेतकऱ्यांनी प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. शक्तिपीठ महामागार्साठी जमीन देण्यास विरोध कायम ठेवत, शेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या भूसंपादनाच्या नोटिसा तातडीने रद्द करून त्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी रामचंद्र मस्के, ॲड. बाळासाहेब पाटील, अभिजित उबाळे, शीतल जोकार, बाबासाहेब शेळके, शिवाजी पाटील, तुषार बारबोले यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. सपोनि रोहित शिंदे यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

सार्वजनिक मध्यवर्ती श्री गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी भाऊसाहेब रोडगे यांची निवड

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- स्वातंत्र्य पूर्वी स्थापन झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मध्यवर्ती महामंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मावळते उत्सव अध्यक्ष श्री सोमनाथ मेंडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मागील वर्षी झालेल्या जमा खर्च, सभेचा विषय आदी विषयावर चर्चा करून उत्सव समिती पदाधिकारी पुढील प्रमाणे एकमताने निवडण्यात आली.

प्रारंभी श्री कामेश्वर गणरायाचे पुजन करून आरती करण्यात आली.

या बैठकीचे प्रास्ताविक ट्रस्टी कार्याध्यक्ष विजय पुकाळे यांनी करून पुढील तिन वर्षा करिता निवडण्यात आलेल्या ट्रस्टी पदाधिकारी यांच्या निवडीचा ठराव मांडला त्यास एकमताने मंजुरी देण्यात आली..

सर्वश्री ट्रस्टी अध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, माजी आमदार नरसिंग मेंगजी सुनील रसाळे, गणेश चिंचोळी रवींद्र आमणे सोमनाथ मेंडके गौरव जक्कापूरे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले.

ट्रस्टी सचिव संजय शिंदे यांनी उत्सव समिती नुतन पदाधिकारी जाहीर केले.

उत्सव अध्यक्ष भाऊ रोडगे, उपाध्यक्ष चक्रपाणि गज्जम, संतोष फताटे, गिरीश शहाणे, दिलीप पाटील ,किसन गर्जे, विश्वनाथ गोयल, शिवानंद सावळगी,गिरीश बुट्टे, कार्याध्यक्ष सुनील शरणार्थी, कार्यवाह रवींद्र रामने सहकार्यवाह आकाश हारकुड, विवेकानंद तालिकोटी, कोषाध्यक्ष अक्षय बिद्री, कार्यालय प्रमुख आशिष उपाध्ये, सहकार्यालयप्रमुख सुनील पंडित संतोष कोंडेवार प्रसिद्धीप्रमुख शिवानंद येरटे, विशाल भांगे सांस्कृतिक प्रमुख गौरव जक्कापुरे, प्रवीण कोणापुरे, मिरवणूक प्रमुख भारत गोटे, प्रशांत लगशेट्टी, आतिष देशेट्टी, गजानन हिरेमठ, विनायक घंटे, श्रीकांत चितारी, संतोष आकुडे ,अनिल शहापूरकर, वीरेश सक्कर्गी

विशेष महिला प्रतिनिधी श्रीमती लताताई फुटाणे, हेमाताई चिंचोळकर, श्रीमती सुमनताई मुदलियार,अंजली मंगोडेकर, सौ प्रिया बसवंती, कायदेविषयक सल्लागार ॲड मंगलाताई चिंचोळकर जोशी, ॲड बसवराज हिंगमिरे, प्रमुख सल्लागार माजी उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके, हिशोब तपासणीस (सीए)एच एस सोहनी ॲंड कंपनी

ट्रस्टी अंबादास गुत्तीकोंडा कैलास मेंगाणे, घनश्याम भैय्या, विष्णु मुधोळकर, अनिल गवळी विवेकानंद उपाध्ये, मल्लिनाथ याळगी, श्रीमती लताताई फुटाणे

हेमा चिंचोळकर या बैठकीत सुमारे तिनशे ते चारशे गणेश भक्त, कार्यकरणीसदस्य, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

डीजे, लेझर लाईटसह ध्वनीवर्धकांवर बंदीची ग्राहक पंचायतीची मागणी

करमाळा (कटूसत्य वृत्त):- डीजे, लेझर लाईट तसेच ध्वनीवर्धकांचा सार्वजनिक व घरगुती कार्यक्रमांमध्ये होणारा बेकायदेशीर वापर रोखून ध्वनी प्रदूषणाबाबतच्या नियमांची कठोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या शिष्टमंडळाने केली आहे. याबाबत शिष्टमंडळाने उपविभागीय पोलीस अधिकारी अंजना कृष्णा विजय सिन्हा यांना लेखी निवेदन दिले. निवेदनाच्या प्रती तहसीलदार शिल्पा ठोकडे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनाही देण्यात आल्या.

ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार ध्वनीची निर्धारित मर्यादा पाळणे आवश्यक असून, रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत ध्वनीवर्धकाच्या वापरावर बंदी आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून ध्वनीवर्धक यंत्रणा जप्त करावी, तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रारींसाठी स्वतंत्र हेल्पलाइन व टोल फ्री क्रमांक सुरू करावा, निनावी तक्रारींचीही दखल घ्यावी आणि तक्रारदारांची ओळख गुप्त ठेवावी. तसेच निवासी व शांतता क्षेत्रात ध्वनीची तीव्रता मोजण्यासाठी यंत्रणा बसवावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

निवेदन देताना जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य माधुरी परदेशी, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे तालुका उपाध्यक्ष चक्रधर पाटील, तालुका सचिव अजीम खान, कोषाध्यक्ष नीलिमा पुंडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

सोलापूरच्या प्रगतीसाठी नव्याने विचार करावा- सुलक्षणा महाजन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सिंगापूरपासून बंगळूरपर्यंत अनेक शहरे 'ग्रीन सिटी' किंवा शाश्वत शहर अशी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. सोलापूरकरांनीही शहराच्या प्रगतीसाठी नव्याने विचार करण्याची गरज असल्याचे मत ज्येष्ठ लेखिका व वास्तुरचनाकार सुलक्षणा महाजन यांनी व्यक्त केले. हिराचंद नेमचंद वाचनालयात 'सोलापूर आजचे-नियोजन उद्याचे' या विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर होते. यावेळी मंचावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ। प्रकाश महानवर, कार्यवाह दत्ता गायकवाड, उपस्थित होते। महाजन यांनी 'पीपीटी' सादरीकरणातून सोलापूरच्या विकासाचा आढावा मांडला. सोलापूरच्या इतिहासातील कापडगिर्ण्यांचा काळ संपल्यानंतर ऊस व साखरेचे अर्थकारण पुढे आले. त्यानंतर सेवा क्षेत्राची वाढ झाली. या बदलाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शहर कसे असावे, याबाबतची भूमिका ठरवायला हवी. शहराच्या विकासात अनेक खाती व यंत्रणा परस्परविरोधी भूमिका घेत असल्याने निधीचा अपव्यय होतो. हे टाळण्यासाठी सोलापूरकरांनी कोणती समस्या प्राधान्याने सोडवायची, हे ठरवावे आणि त्यानुसार महानगरपालिकेने उपाययोजना कराव्यात. बंगळूरमध्ये वाहनधारकांकडून १५ ते ५० हजार रुपये कर घेऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत केली जात आहे. संभाजीनगरात ४०० नागरिकांनी वाहतूक समस्येवर डेटा तयार करून निश्चित उत्तरांचा शोध घेतला. सोलापूरकरांनीही डेटा, विश्लेषण व अभ्यासपूर्ण उपाय या त्रिसूत्रीचा अवलंब करून हा अभ्यास लोकप्रतिनिधींसमोर मांडावा, असे त्यांनी सांगितले. कामगारांसाठी दहा हजार घरकुले बांधली, तरी तिथे नागरिक राहत नाहीत. त्यामुळे शिक्षण, वाहतूक, बाजारपेठ आदी सुविधांची गरज लक्षात घेऊन त्या उपलब्ध करून देण्याची संवेदनशीलता स्थानिक यंत्रणेकडे असावी. अजूनही ७४व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेले अधिकार अमलात आलेले नाहीत. त्यामुळे या संस्थांना स्वायत्ततेचा उपयोग करता आला नाही, उड्डाणपुलाने काही होत नाही उड्डाणपूल बांधल्याने वाहतूक समस्या सुटते, असे मानले जाते. मात्र, मुंबईसह अनेक शहरांत उड्डाणपूल उभारूनही वाहतुकीच्या समस्या कायम राहिल्याचे दिसते. चीन आणि सेऊलमध्ये उड्डाणपूल पाडले जात आहेत. त्यामुळे उड्डाणपुलाची गरज अभ्यासातून निश्चित केल्यानंतरच तो उभारावा, असे महाजन यांनी सांगितले. यावेळी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांनी मनोगत व्यक्त केले. वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह डॉ. नभा काकडे यांनी प्रास्ताविक केले .उपाध्यक्षा मंजूषा गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

कष्टाने फुलवलेली तोंडल्याची बाग एका रात्रीत उद्ध्वस्त; शेतकऱ्याच्या स्वप्नांवर कोयत्याचा घाव

टेंभुर्णी, (कटूसत्य वृत्त):- रक्ताचे पाणी करून, मेहनतीने फुलवलेल्या तोंडल्याच्या बागेवर समाजकंटकाने धारदार कोयत्याने घाला घातल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. चव्हाणवाडी रोड, टेंभुर्णी येथील गट क्रमांक ८३/५ मधील नंदकुमार सदाशिव कथले यांच्या भरात आलेल्या १५ गुंठे तोंडल्याच्या बागेची अज्ञात व्यक्तीने बुधवारी रात्री छाटणी करून अक्षरशः नासधूस केली.

गुरुवारी सकाळी कथले बागेत गेले असता संपूर्ण बाग उद्ध्वस्त झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. डोळ्यांसमोर उभी केलेली आणि उत्पन्न देऊ लागलेली बाग अशा अवस्थेत पाहून शेतकऱ्याला मोठा धक्का बसला.

या घटनेत कथले यांचे अंदाजे एक ते सव्वा लाख रुपयांचे नुकसान झाले असून, या बागेतून त्यांना दररोज सुमारे दोन हजार रुपयांचे उत्पन्न मिळत होते. त्यामुळे केवळ पिकाचे नुकसान झाले नसून आगामी काळातील नियमित उत्पन्नाचा आधारही हिरावला गेला आहे.

शेतकऱ्याने मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या पिकाची अशा प्रकारे नासधूस करणाऱ्या समाजकंटकाचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

शंकरनगर येथील श्री शिवपार्वती मंदिरात महाआरती संपन्न

अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलुज येथील महाशिवरात्र यात्रा समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्या वतीने पवित्र श्रावण मासाच्या समाप्ती सोमवार दिनांक 07/09/2026 रोजी सायंकाळी 7.00 वाजता शंकरनगर येथील श्री शिवपार्वती मंदिरात महाआरती संपन्न झाली.श्रावण महिन्याभर नामजप, शिवलीला अमृत ग्रंथवाचन, हरिपाठ, प्रत्येक सोमवार लघुरुद्र अभिषेक आयोजन करण्यात आले होते. नागपंचमी सणानिमित्त पर्वती मंदिरावर दोन दिवस सांस्कृतिक वारसा असणा-या विविध पारंपारिक खेळ व उपक्रमाचे आयोजन केलेले होते. यामध्ये हजारो महिला, मुली पारंपारिक वेशभूषेत सहभागी होवून खेळाचा आनंद लुटला श्रावण महिन्यातील चौथा सोमवार दिनांक 07/09/2026 रोजी सायंकाळी 07.00 वाजता शिवपार्वती महाआरती संपन्न झाली. नंतर हर हर महादेवा पार्वती शंकर सदाशिवा हा नाम जप होऊन प्रसाद वाटप करण्यात आले तसेच शोभेची दारु कामाचे सुंदर देखावे व तोफा उडवण्यात आल्या. यावेळी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, महाशिवरात्र यात्रा समितीचे अध्यक्ष जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुलक्षणादेवी जयसिंह मोहिते-पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील त्यांच्या पत्नी कांचनमालादेवी मदनसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील व स्वरुपाराणी जयसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह रणजितसिंह मोहिते-पाटील, कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव रामचंद्र माने-देशमुख व संचालक मंडळ, पुरुष व महिला भाविक माळशिरस तालुका परिसरातील भाविक साधारण 14 ते 15 हजार उपस्थितीत होते.